2021-2022

# CALL FOR BOOK CHAPTER

## Certificate

This is to certifiy that Dr./Shri./Smt. निलीमा पी. माहोरे has successfully published his/her call for book chapter titled महिलांची परीवर्तनशील भुमिका (कोरोना काळातील परिस्थितीवर आधारीत) through Research Ink Publication with ISBN 97978-1-6780-4773-3 in the Year 2021.

**Published By**
**LULU Book Publication**
Hisborough St, Raleigh
United States of America (USA)

**Printed By**
**Research Ink Publication**
258/34, Raviwar Peth, Solapur - 413005
Maharashtra, India.
researchink2020@gmail.com | **www.lbp.world**
+91 7796563363 | +91 9595359435


**Authorized Signature**
Research Ink Publication

# महिलांची परीवर्तनशील भुमिका

## (कोरोना काळातील परिस्थितीवर आधारीत)

प्रा. डॉ. मंजिरी मिंलिंद चेपे
डॉ. सुनिता बाळापुरे








# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ कमांक |
|---|---|---|
| १ | मी, ती आणि कोविड – 19<br>**प्रा. डॉ. मंजिरी चेपे** | १ – ८ |
| २ | महिलांचे परिस्थितीजन्य भूमीका<br>**प्रो. डॉ. सुनिता एस. बाळापूरे** | ९ – २३ |
| ३ | कोरोना काळातील बालसंगोपन विषयक समस्या<br>**प्रा. डॉ. निलीमा पी. माहोरे** | २४ –३० |
| ४ | कोविड 19 व भारतीय संस्कृती<br>**प्रा डॉ ज्योती वि हावरे** | ३१ – ३७ |
| ५ | सामाजिक व्यवस्थेतील परिवर्तन<br>**डॉ सारीका एस. बोदडे** | ३८ – ५० |
| ६ | कौटुंबिक स्वास्थ्य<br>**प्रा. डॉ. शामली जा. दिघडे** | ५१ – ६४ |
| ७ | टाळेबंदी काळात अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. मोनाली वि. इंगळे** | ६५ – ७६ |
| ८ | करोना काळातील किशोरांच्या समस्या<br>**प्रा. प्राची भांबुरकर** | ७७ – ८१ |
| 9 | कोविड–19 – स्त्रियांची मानसिक स्थिती<br>**डॉ. संध्या अनिल काळे** | ८२ – ८९ |

# प्रकरण — ३

# कोरोना काळातील बालसंगोपन विषयक समस्या


**प्रा. डॉ. निलीमा पी. माहोरे**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती.


विज्ञानाच्या जोरावर संपूर्ण अवकाशाला गवसणी घालू पाहणाऱ्या आज आपल्या मानवजातीला एका निर्जिव व्हायरस ने चारही मुंड्या चित करून, संपूर्ण विकासाला, संपूर्ण प्रगतीला, संपूर्ण जगाला आपल्या कवेत सामावून घेण्याच्या जिज्ञासेला जबरदस्त चपराक दिली, आणि संपूर्ण मानवजीवन बंदिस्त करून टाकले. कोरोना व्हायरसचे आगमण होण्यापूर्वी जर अशी परिस्थिती ओढवू शकते. असे आपल्याला कोणी सांगितले असते, तर आपण कदापी ते मान्य केले नसते.

विज्ञानाच्या जोरावर आज सर्वच क्षेत्रामध्ये मानवाने आमुलाग्र क्रांती घडवून आणली हे नि:संशय. परंतू ही प्रगती साधत असतांना निसर्गाची किती अधोगती झाली हे पाहायला आपण मानव जात विसरलो आणि त्याचे जे व्हायला नको तेच दूष्परिणाम झाले.

निसर्गाला डिवचले नैसर्गिक असणाऱ्या गोष्टी कृत्रिम लॅब मध्ये तयार होऊ लागल्या आणि प्रगती च्या नावाखाली मानव त्यातच धन्यता मानू लागला. जगाच्या एका ठिकाणी तयार होणारा व्हायरस काही समाजण्याच्या आतच सर्वदूर पसरू लागला आणि पाहता पाहता कोरोना व्हायरसने संपूर्ण जगाला विळखा घातला. एका संसर्गजन्य आजाराने संपूर्ण जगाला हालवून सोडले. कोणतीही लस नाही आणि कोणतेही नेमके औषध नाही, अशा परिस्थितीत कोरोना व्हायरस सोबत लढा देणे भाग पडले. आणि अशा परिस्थितीत देशाच्या आर्थिक, सामाजिक कोणत्याच नुकसानाची तमा न बाळगता कोरोना व्हायरस ची साखळी तोडण्यासाठी लॉकडाऊन हा एकमेवर पर्याय समोर आला.

'लॉकडाऊन या एका शब्दाने संपूर्ण जगात उलथापालथ झाली आली प्रत्येक कुटुंबाला आपल्या घरातच बंदिस्त राहण्याची वेळ आपल्यावर आणि त्यामुळे लॉकडाऊनचे परिणम समाजाच्या सर्वच स्तरावर झालेले आपल्या निदर्शनात आले.

घरातील लहान मूले, घरातील कर्ता सवरता पूरूष, उद्योजक किंवा नोकरदार महीला, घरातील आबाल, वृध्द सर्वांनाच आपआपल्या घरात बंदिस्त राहावे लागले. जाणत्या वयातील माणसांनी या गोष्टी समजूनही घेतल्या पण ज्या घरात लहान मुले आहेत ज्या मुलांना ना लॉकडाऊनचा अर्थ समजतो ना कोरोना व्हायरसचा अर्थ समजतो, खाणे –पिणे आणि खेळणे एवढेच ज्यांचे विश्व आहे अश्या चिमूकल्यांची समजूत घालून त्यांना घरातच राहावयास भाग पाडतांना पालकवर्गाचे विशेषत: आईचे कौशल्य मात्र पणास लागले हे निश्चित!

लॉकडाऊन मुळे ज्या घरात लहान मुले आहेत अशा घरातील मातांना आपल्या मुलांना सांभाळतांना नेमक्या कोणकोणत्या समस्या आल्यात हे जाणून घेण्यापूर्वी बाल्यावस्थेतील वैशिष्ट्यांवर आपण विचार करणे क्रमप्राप्त ठरते

**समवयस्कांकडे ओढ:**

बालक लहान असतांना आपले आई वडील आणि आपल्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्ती एवढेच मुलांचे विश्व असते. मात्र जसजशी मुले मोठी होत जातात तसतसे मुलांचे भावविश्व व्यापक होत जाते आणि आपले मित्र आपल्या मैत्रिणी यामध्ये मुले रममाण होत जातात. समवयस्क मुलामुलींसोबत खेळतांना मुलांना आनंद मिळतो. मित्रांसोबत खेळतांना मुले आपली तहान—भुक सुध्दा विसरतात

**प्रबळ जिज्ञासू वृत्ती:**

या वयात मुलांमधली जिज्ञासु वृत्ती वाढीस लागते हे असे का? ते तसे का? अशा सारखे प्रश्न विचारून मुले भंडावून सोडतात कारण या वयामध्ये मुलांमध्ये प्रबळ जिज्ञासू प्रवृत्ती दिसून येते त्यामुळे मुलांच्या जिज्ञासू प्रवृत्तीला खतपाणी घालणे आणि त्यांच्या जिज्ञासेची समाधान करणे आई वडीलांचे कर्तव्य ठरते. आणि मुलांच्या जिज्ञासेचे समर्थन करतांना पालकांची दमछाक होते

**आत्मनिर्भरतेची भावना :**

बाल्यावस्थातील मुलांमध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण होते. आपले पालक करणारे कोणतेही काम आपणही करू शकतो

अशी भावना मुलांमध्ये निर्माण होते आणि त्या दृष्टीने मुले पाऊले देखील उचलतात. यावेळी मुलांना इजा न पोहोचता आणित्यांच्या आत्मनिर्भरतेला देखील तडा न जाऊ देता पालकांना मुलांना प्रोत्साहन देऊन मुलांच्या कलाकलाने त्यांना घरातील सर्वच गोष्टीमध्ये सहभागी करून घ्यावे लागते.

**प्रबल सामाजिक प्रवृत्ती :**

या वयात मुलामध्ये प्रबळ सामाजिक प्रवृत्तीचा विकास होतो. मुलांना इतरांमध्ये रमायला आवडते. घरात पाहूणे आल्यास आणि त्यात समवयस्कमुळे असल्यास मुले आनंदी होतात आणि लगेच मैत्री करतात.

**अनुकरण आणि खेळण्यातूनच विकास :**

बाल्यावस्थेमध्ये मुले अनुकरणातून शिकतात मोठ्यांचे अनुकरण करणे, मुलांना आवडते. याशिवाय खेळल्यामुळे मुलांचा शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकास योग्य दिशेन होतो. त्यामुळे या वयात मुलांनी खेळणे अत्यावश्यक ठरते.

**कोरोना काळातील बालसंगोपनातील अडचणी:**

जन्मापासून साधारण १ ते १।। (दिड) वर्षापर्यंत आपले कुटुंबच मुलांचे विश्व असते बाहेरील कुणी व्यक्ती घरात आली तरी मुलं भांबावतात आणि आईच्या पदरामध्ये लपून बसते. मात्र जसजसे मुलं मोठे होते तसतसे ते इतरांमध्ये रमायला लागते घराचे जरा दार उघडले की सर्वांची नजर चूकवून मुले घराबाहेर पडतात आणि खेळायला लागतात कोणत्याही वस्तूला स्पर्श करतात केव्हाही हात तोंडात घालतात. एकदंरीत काय तर मुलांच्या या बालसुलभ वैशिष्टयावरच कोरोनामुळे अटकाव निर्माण झाला. आणि त्यामुळे कोरोना काळामुळे बालसंगोपनात पुढील प्रमाणे अडचणी निर्माण झाल्या.

मात्र कोरोना काळामध्ये लहान मुलांची फारच कोंडी झाली. मुलांना सतत बंद दरवाज्याआड राहावे लागते त्यामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थावर विपरित परिणाम झाला आणि मुलांना सतत घरात ठेवतांना पालकांसमोर देखील असंख्य समस्या निर्माण झाल्या.

लॉकडाऊन दरम्यान पालकांसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे मुलांनी बाहेर जाऊन खेळू नये सामाजिक अंतर राखले पाहिजे आणि सतत हात धुतले पाहिजे. जंतू संसर्ग नावाचा विषय मुलांच्या मनालाही सुध्दा शिवत नाही. उलट दिलेली वस्तू किंवा

खाद्यपदार्थ आधी खाली सांडवून मगच ती खाण्यात मुलांना आनंद मिळतो आणि मुलांच्या अशा अवस्थेत मुलांना कोरोना नियम पटवणे व शिकविणे हे पालकांसमोर एक सर्वात मोठे आव्हान आहे.

गार्डन बंद, स्विमींग टॅक बंद, मुलांचे खेळणे बंद, फिरणे बंद, अशा अवस्थेमध्ये लहान मुलांमध्ये निर्माण होणरी उर्जा आणि शक्तीला कसे वळण लावावे हा महत्वाचा प्रश्न पालकांसमोर आहे.

**मुलांची खाण्यापिण्याची समस्या :**

बाल्यावस्थेमध्ये पालक मुलांना बाहेरचे फारसे काही खायला देतच नाही. परंतु असे असले तरी एखादे वेळी दिले जाणारे वेफर्स, चॉकलेट, मॅगी, हा गोष्टी देण्यात देखील पालकवर्गाच्या मनामध्ये संभ्रम होता. बाहेरचे कच्चे काही खावू नये, फळे आणि भाज्या देखील आधि निर्जंतूक करूनच खाव्यात यामुळे मुलांना बाहेरचे काही खायला देतांना पालवर्गाची दमछाक झाली. घरातल्या घरातच मुलांच्या आवडी निवडी सांभाळतांना पालकवर्गाला विशेषत: आईला पौष्टिक आणि चवदार पदार्थ तयार करण्यासाठी आपले कौशल्यपणाला लावावे लागले.

बालसल्लागार आणि पालक प्रशिक्षक संगोपण आर्ट ऑफ पॅरेंटिंगच्या डॉ. अंजली चौधरी यांच्या म्हणण्यानूसार लॉकडॉऊन सूरू झाल्यापासून पालकांचे फोन येण्याचे प्रमाण दूप्पट झाले आहे. मुलांना घरातल्या घरात ठेवून आनंदी कसे ठेवावे याबाबत पालकांना मार्गदर्शन हवे आहे घरातल्या घरात राहून मुले चिडचिड झाली आहेत. पालकांना मुलांचा मूड, राग आणि मुलांशी संबंधित इतर समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे पालकत्व अधिक कठीण झाले आहे. आणि या समस्येला चांगल्या प्रकारे सामोरे जाण्यासाठी पालकांना मार्गदर्शनाची नितांत गरज भासली.

**मुलांच्या आरोग्याबाबत आणि हॉस्पीटल बाबतच्या समस्या:**

मुलांच्या खाण्यातून आणि खेळण्यांतूनच मुलांचा शारीरिक विकास होतो खेळतांना मुलांचा व्यांयाम होतो आणि व्यायामातून मुलांचे शरीर मजबूत होते. लॉकडाऊन दरम्यान मुलांच्या खेळण्यावरच बंदी आली त्यामुळे मुलांची चिडचिड झाली आणि मुलांमध्ये शारीरिक निष्क्रीयता निर्माण झाली. याशिवाय बाल्यावस्थेमध्ये वातावरणातील बदलामुळे सर्दी, ताप यासारख्या

समस्येला मुलांना सतत सामारे जावे लागते. याशिवाय मुलांचे लसीकरणही या वयात सूरू असते.

मात्र लॉकडाऊन च्या काळामध्ये दवाखाने बंद नसले तरीही डॉक्टरांमध्ये देखील भितीचे वातावरण असल्यामुळे मुलांच्या औषधोपचारवर देखील आणि लसीकरणावर विपरित परिणाम झाला आणि मुले आजारी पडू नयेत यासाठी पालकवर्ग सतत मानसिक तणावाखाली राहीला.

**मुलांच्या ऑनलाईन शाळा :**

मोठ्या प्रयत्नांनी टि.व्ही. आणि मोबाईलच्या प्रलोभणापासून मुलांना दूर ठेवण्याऱ्या पालकवर्गाला नाईलाजास्तव तोच मोबाईल अभ्यासासाठी मुलांच्या हातात द्यावा लागला. ज्या मोबाईलला अभ्यासामध्ये व्यत्यय म्हणून शाळा आणि महाविद्यालयामधून हद्दपार केले होते. त्याच मोबाईलच्या माध्यमातून शिक्षण सूरू झाले. यासाठी स्वतःचा मोबाईल मुलांना द्यावा लागला किंवा मुलांसाठी वेगळा मोबाईल काही पालकांना द्यावा लागला दोनही पर्याय पालकांसाठी त्रासदायक ठरले. याशिवाय मोबाईवरून मुलांना अभ्यासाचा सराव नसल्याने मुलांकडून अभ्यास करून घेणे पालकांसाठी फारच डोकेदुखीचा विषय ठरला.

**पालकांच्या ऑनलाईन कामाच्या वेळा :**

जोपर्यंत नोकरदार पालकवर्ग घरी होता, तो पर्यंत केवळ मुलांना घरच्या घरी सांभाळण्याचीच समस्या होती, मात्र जेव्हांपासून नोकरदार पालकवर्गाच्या ऑनलाईन ड्यूटीची कामे सूरू झाली तेव्हांपासून पालकांना आपल्या कामाच्या वेळा आणि मुलांना सांभाळणे या गोष्टीची सांगड घालणे अधिकच आव्हानात्मक ठरू लागले.

लॉकडाऊन ने पालक आणि मुलांच्या नात्याला नवीन प्रकारे परिभाषीत केले पालकांना नेहमीच मुलांसोबत जास्त वेळ घालवायचा असतो, उलट कोणताही नित्यक्रम नसतांना जेवणाची, खेळण्याची वेळ, यासर्व गोष्टींबरोबरच मुलांच्या मागण्यापूर्ण करण्यात पालकवर्ग व्यस्त आणि आनंदी होता. मात्र जेव्हा पासून घरगुती कामाचा अतिरिक्त ताण, आणि नोकरीच्या कामाचे दडपण व वेबीनार, व्हीडीओ कॉल, ऑडीओ कॉल, ऑनलाईन मिटींग असे ओझे पालकांवर आले तेव्हांपासून पालकांची खरी गूंतागूंत सुरू झाली.

**टि.व्ही. आणि मोबाईलचा अतिरिक्त वापर :**

शालेय अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या प्रक्रियेमुळे मुलांना पाच ते सहा तास मोबाईल किंवा लॅपटॉपच्या समोर बसून राहावे लागले त्यासाठी स्मार्टफोन आणि नेट या दोन्ही गोष्टी मुलांसाठी अनिवार्य झाल्या पाच ते सहा तास सतत मोबाईल किंवा लॅपटॉप समोर बसून डोळ्यांवर देखील या नाजूक वयात ताण निर्माण होतो. अनेक पालकांना लॉकडाऊनच्या आधीच आर्थिक ओढाताणीच्या काळात मुलांना स्मार्टफोन घेऊन द्यावा लागला.

**वेळेचे नियोजन :**

घरातील सर्वच सर्व सदस्य घरात असल्यामुळे गृहीणीचे आणि नोकरदार महीला वर्गाचे देखील कामाचे वेळापत्रक पार कोलमडले आहे. घरातील सर्वांची मर्जी सांभाळतांना वेळेचे नियोजन करणे महिलांसाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्याचबरोबर मुलांच्या देखील खाण्यापिण्याच्या, खेळण्याच्या, झोपण्याच्या वेळा सांभाळतांना पालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

**कोरोनाकाळातील समस्यांवर उपाययोजना :**

समस्या कितीही जटील असल्या तरी कोणत्याही समस्येशी दोन हात करण्याची तयारी आपण भारतीय लोक करतोच. त्याचप्रमाणे लॉकडाऊन चा कालावधी टप्प्याटप्प्याने वाढत होता, आणि पाहता पाहता सर्वजण परिस्थितीशी समायोजन करणे शिकले. घराच्या उंबरठ्याच्या आतच सगळा दिवस घालविणे ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट आपण संगळ्यांनी सहज अंगिकारली परिस्थितीशी समायोजन साधेपर्यंतचा काल सर्वांनाच कठीण गेला. मात्र येणाऱ्या संकटाचे भान ठेऊन मोठ्यांनी परिस्थितीवर मात केली. परंतु लहान मुलांना परिस्थितीची समज नसल्याने मुलांना मात्र परिस्थितीशी जूळवून घेणे कठीण गेले. परंतु तरीही घरातल्या प्रत्येकासाठी लॉकडाऊन दरम्यान दैनंदिन कार्यक्रमांमध्ये सुसंबंध्दता असायला हवी.

पालकांनी आपल्या प्रत्येक कार्यात आपल्या मुलांना सामिल करून घेतले पाहिजे आणि घरातील काम, ऑफीसचे काम, अभ्यासाची वेळ, टि.व्ही. पाहण्याची वेळ, कौटुंबीक खेळांसाठी वेळ याचे नियोजन करणे अतिशय आवश्यक आहे.

यासाठी पालकांनी घरातल्या घरातच चित्रकला स्पर्धा आयोजित करणे, गाणी म्हणणे, यासारखे उपक्रम राबविले पाहिजे.

घरातल्या घरातील खेळ मुलांबरोबर खेळून मुले जिंकल्यास त्यांना प्रोत्साहनपर पार्टीचे आयोजन करणे, की जेणे करून मुलांना त्यातून आनंद मिळेल असे आयोजन करायला हवे.

मुलांना घरातल्या प्रत्येक गोष्टीत सहभागी करून घ्यायला हवे घरामध्ये खेळकर आनंदी, उत्साही मुलांना प्रेरणा देणारे, त्याला विविध कामामध्ये संधी उपलब्ध करून देणारे, आत्मविश्वास वाढविणारे वातावरण उपलब्ध करून दिले पाहिजे. मुले काही काम करीत असल्यास त्यांना मार्गदर्शन करावे. पालकांचे मार्गदर्शन आणि प्रेम यामुळे मुलांमधला आत्मविश्वास वाढतो आणि आनंदी राहण्याची प्रवृत्ती मुलांमध्ये निर्माण होते.

मुलांना सर्जनशिलपणे नेहमी व्यस्त ठेवले पाहिजे. मुलांना छंदानां प्रोत्साहीत करावे. त्याच्याजवळ बसून गोष्टी कराव्या मुलांच्या शंकाचे निरसन करावे.

लॉकडाऊन मुळे आपल्याला मिळालेला वेळ ही आपल्यासाठी एक सूवर्णसंधी आहे असे समजून या संधीचे सोने करावे.

ISBN 978-93-82964-03-2



डॉ. दिनेश किसनराव राऊत
शिक्षण : एम. ए. (मराठी); जिवाजी विश्वविद्यापीठ ग्वालियर, एप्रिल २००० (प्रथम श्रेणी); पीएच. डी. (मराठी), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती २००६
सेवा : युवाशक्ती कला आणि विज्ञान महाविद्यालय, अमरावती २०११ पासून सेवेत

संशोधन कार्य :
'डॉ. सुभाष सावरकरांच्या कथात्म साहित्याचा विवेचक अभ्यास'
अध्यक्ष : जनक्रांती युवा संघटना, महाराष्ट्र राज्य
- क्रांतिज्योती ब्रिगेड, अमरावती जिल्हा

सभासदत्व :
- मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती (२००४)
- विदर्भ साहित्य संघ (२००५)
- मधुकर केचे प्रतिष्ठान, अमरावती (२००५)
- डेबू प्रतिष्ठान, अमरावती (२००६)
- 'अक्षरवैदर्भी' या विदर्भातील एकमेव वाङ्मयीन मासिकाचे सह संपादक (२००६)
- साप्ताहितक 'पद्दलित जनमंच' चे अमरावती जिल्हा प्रतिनिधी (२००६)
- साप्ताहिक 'जनसाहित्य मंच' चे अमरावती जिल्हा प्रतिनिधी (२००९)
- आंतरराष्ट्रीय यंग मेन ख्रिश्चन असोसिएशन दिल्ली (२००७)
- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती प्राध्यापक परिषद, आजीव सदस्य (२००७)
- बोली साहित्य संघ, नागपूर (२००६)
- राष्ट्रसंत तत्वविचार संशोधन समिती गुरुकुंज, सह सचिव (२००७)
- राज्य तथा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये सक्रीय सहभाग
- अ. भा. 'मराठी जनसाहित्य' चर्चासत्रात कृतिशील सहभाग

कृतिशील सहभाग
- सचिव, स्व. गजाननराव राऊत बहुउद्देशिय जनशिक्षण संस्था, नेरपिंगळाई. (२००८)
- सचिव, श्री संत तुकडोजी महाराज बहुउद्देशिय जनशिक्षण संस्था, अमरावती (२००९)
- मराठी साहित्य परिषद, पुणे (२००९)
- युवात्ती कला आणि विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी (२०१४ ते २०२०)
- यु. जी. सी. पुरस्कृत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग.
- विविध यु.जी.सी. पुरस्कृत मासिकांमधून लेख प्रकाशित.
- मराठी जनसाहित्य परिषदेतर्फे 'जनसाहित्य पुरस्कार' (२००८)
- अखिल भारतीय आणि राज्यस्तरीय साहित्य संमेलनामध्ये सहभाग.
- अक्षरवैदभी सा. पददलित जनमंच, या जनसाहित्य मंच, दै. देशोन्नती, सकाळ, लोकमत या वृत्तपत्रांमधून कविता आणि समीक्षणपर लेख प्रकाशित.

प्रा. डॉ. दिनेश कि. राऊत
पत्ता : गुरुकृपा कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, दंत महाविद्यालयसमोर, वडाळी कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
मोबा. : ८९९९८९४२१४।९७६४६८८१५८

जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी,
अमरावती-४४४६०५.
दूरध्वनी क्र.०७२१-२५७७४१८

# डॉ. सुभाष सावरकरांचें कल्पविश्व



डॉ. दिनेश कि. राऊत

▮ डॉ.सुभाष सावरकरांचे कल्पविश्व
Dr.Subhash Sawarkaranche Kalpwishva

▮ प्रथमावृत्ती– २७ डिसेंबर २०२१
▮ © लेखक- डॉ.दिनेश किसनराव राऊत, अमरावती
▮ मराठी जनसाहित्य परिषद, जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती-५.

▮ मुखपृष्ठ संकल्पन-प्रा.मनीष चोपडे, अमरावती.

▮ अक्षर जुळवणी-रवी डाहाके, नलिन कॉम्प्युटर्स, भूमिपुत्र कॉलनी, कॉंग्रेसनगर रोड, अम.

▮ मुद्रक- चंद्रकांत सुकलकर, श्रीगुरुदेव कन्सल्टन्सी अँड प्रिन्टर्स, शेगाव रोड, अमरावती.

▮ मूल्य- रुपये २५०/- (रुपये दोनशे पन्नास फक्त)

# अर्पण



ज्यांनी मला माझ्या आयुष्याच्या वाटेवर
नीट रस्ता दाखवून चालण्यास शिकवलं
ते माझे प्रेरणास्थान
ज्येष्ठ बंधू
स्व.गजानन किसनराव राऊत
यांना
सादर अर्पण...

# नव्वदोत्तरी आत्मकथने :
# स्वरुप आणि चिकित्सा

मी एक स्वप्न पाहिलं

झोळी

आपुलाचि वाद आपणासी

झुंज

कटेरी पायवाट

आमचा बाप आणि आम्ही

माणूस आहे म्हणून

कोल्हाट्याचं पोर

दोरखंड


मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

संपादक

डॉ. मारोती कसाब

सहसंपादक

डॉ. अनिल मुंढे

**ISBN No. 978-81-958253-1-8**

'नव्वदोत्तरी आत्मकथने : स्वरूप आणि चिकित्सा'
मुख्यसंपादक
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार
संपादक
डॉ. मारोती कसाब
सहसंपादक
डॉ. अनिल मुंढे

प्रकाशक
सिध्दी पब्लिकेशन हाऊस
६२४, बेलानगर, भावसार चौक,
तरोडा (खु.) नांदेड ४३१६०५
मो. ९६२३९७९०६७
www.wildrj.com

मुद्रक
अनुपम प्रिंटर्स , श्रीनगर, नांदेड (महा.)
९१७५३३२४४३७

प्रथमावृत्ती : ११ सप्टेंबर२०२३
© सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर अधीन

मुखपृष्ठ : तेजस रामपूरकर

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : ४७५/-

सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकुराकरीता सदरील संशोधक स्वत:
जबाबदार राहतील संपादक किंवा प्रकाशक जबाबदार असणार नाही.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय | डॉ. मारोती कसाब<br>डॉ. अनिल मुंढे | ०६ |
| ०२. | मातंग कुटुंब जीवनाची लक्षणीय मांडणी : 'दोरखंड' | प्रा. डॉ. दिनकर कुटे | ११ |
| ०३. | 'आपुलाचि वाद आपणांसी' : एका कार्यकर्त्याचे वास्तव आत्मकथन | डॉ. गोविंद काळे | २० |
| ०४. | भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनांचे स्वरुप | डॉ. सरला गोरे / सावकारे | २९ |
| ०५. | भटक्या जमातीच्या कार्यकर्त्यांची आत्मकथने | डॉ. सतेज दणाणे | ३५ |
| ०६. | सुसंस्कृत तरुणाची गळचेपी उलगडणारे आत्मकथन : काटेरी पायवाट | डॉ. सुहासकुमार बोबडे | ४१ |
| ०७. | नव्वदोत्तर काळातील कार्यकत्यांची आत्मकथने स्वरुप आणि चिकित्सा | भरत शिवाजीराव गायकवाड<br>कांचन रामदास मुखेडकर | ६० |
| ०८. | केसरी पाटील यांचा जीवनप्रवास मराठी तरुणांसाठी आयडॉल | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | ७२ |
| ०९. | नव्वदोत्तरी काळातील भटके - विमुक्तांची आत्मकथने | भीमराव कुंडलिक जमधाडे | ७९ |
| १०. | नव्वदोत्तरी दलित आत्मकथने | स्वाती शिवाजी चोधरी | ८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | रामराव झुंजारे यांच्या 'झुंज' या आत्मकथनाचे वाङ्‌मयीन स्वरूप | डॉ. लालबा चां. दुमटकर | ९० |
| १२. | दलित आत्मकथने | प्रा. शिवदास दगा पावरा | ९६ |
| १३. | 'कोल्हाट्याचं पोर' वंचित समूहाच्या वेदनेचा उद्गार | प्रो. मंदाकिनी ए. मेश्राम | १०० |
| १४. | डवरी गोसावी समाजाच्या वेदनेची संघर्षगाथा : 'झोळी' | डॉ. अनंता सूर | १०६ |
| १५. | दलित आत्मकथने ; स्वरूप, वैशिष्ट्ये | प्रा. डॉ. दिनेश किसनराव राऊत | ११८ |
| १६. | आद्य पद्य आत्मकथनकार - संत नामदेव | प्रा. प्रमोद भ. इंगोले | १२८ |
| १७. | मानवी संवेदनांचा जागता दस्तऐवज : 'माणूस आहे म्हणून' | प्रा. डॉ. रामकृष्ण बदने | १३६ |
| १८. | 'भुक आणि भरारी ' आत्मकथन स्वरुप आणि विशेष | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | १४३ |
| १९. | 'आपुलाचि वाद आपणांसी' : एक परखड आत्मकथन | डॉ. मारोती बालासाहेब भोसले | १५३ |
| २०. | वाचकांचे मन हेलावून टाकणारी: 'सावत्र आई' | विश्वनंदा दयानंद नंदवंशी | १६१ |
| २१. | मातंग जात समूहातील झुंजार बाप-लेकांनी व्यवस्थेविरुद्ध दिलेली ' झुंज' | डॉ. मारोती द. कसाब | १६९ |
| २२. | स्वप्नपूर्तीची जिद्दी कहाणी : "मी एक स्वप्न पाहिलं " | अजय श्रीराम मुरमुरे | १७७ |





| | | | |
|---|---|---|---|
| २३. | 'आमचा बाप आणि आम्ही' या आत्मकथनाचे वेगळेपण | बापूराव सहदेव डोंगरे | १८९ |
| २४. | बिनबापाच्या पोराची कथा 'कोल्हाट्याचं पोर' | डॉ. मधुकर बैकरे | १९४ |
| २५. | भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनातून चित्रीत झालेल्या समस्या | डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे | २०३ |
| २६. | झाडा झडती या कादंबरीच्या अनुषंगाने धरणग्रस्तांचे आत्मकथन | सौ. अश्लेषा सचिन कुंभार<br>प्राचार्य डॉ. दिलीप भीमराव गायकवाड | २१५ |
| २७. | व्यवस्थेविरोधाची 'झुंज' | प्रा. डॉ. वनिता बापू शिंदे | २२२ |

# दलित आत्मकथने : स्वरूप, वैशिष्ट्ये

**प्रा. डॉ. दिनेश किसनराव राऊत**

युवाशक्ती कला आणि विज्ञान महाविद्यालय, अमरावती

दलित आत्मकथने ही दलित साहित्याची एक मोठी जमेची बाजू आहे. अंतर्मुख पातळीवरील चिंतनशीलता आणि प्रांजळ आत्मकथन हे आत्मकथनाचे महत्त्वाचे विशेष होत. या आत्मकथनकारांच्या पूर्वायुष्यातील आत्मकथनाला आंबेडकरी चळवळीची प्रेरणादायक पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीने या लेखकांना शिक्षित केले आहे. त्यांच्या जीवनात नव्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या प्रगतीची वाट दाखवून दिली आहे. तसेच त्यांना लिहितेही केले आहे. या लेखक-लेखिकांची वये बघितली तर असे दिसते की, 'तराळ - अंतराळ'चे लेखक शंकरराव खरात, 'माझ्या जन्माची चित्तरकथा'च्या लेखिका शांताबाई कृष्णाजी कांबळे, 'जिणं आमुचं'च्या लेखिका बेबी कांबळे असे काही मोजके अपवाद वगळले तर बाकीच्या आत्मकथनांचे लेखक चाळिशीच्या आतील वयाचेच आहेत. 'अक्करमाशी'चे लेखक शरणकुमार लिंबाळे, 'गबाळ'चे लेखक दादासाहेब मोरे, 'उचल्या'चे लेखक लक्ष्मण गायकवाड, 'कोल्हाट्याचं पोर'चे लेखक किशोर काळे यांची वये तर लेखन करताना तिशीच्या आसपासच होती. याशिवाय ही आत्मकथने तृप्त मनाने लिहिलेली नसून, ही आत्मकथने म्हणजे आतल्या आत ठसठसणाऱ्या जखमांनी विव्हळ झालेल्या मनाची अस्वस्थ मनाने केलेली कथने आहेत. ती लिहिताना एकदा भूतकाळात घडून गेलेल्या घटनांनी पुन्हा एकदा घायाळ होण्याचा अनुभव त्या-त्या दलित लेखकाला आलेला आहे. 'वाटचालीत उठलेल्या पाऊलखुणांकडे बघून आपले आपणच उसवत चालल्यासारखे वाटते, ही भावना आहे. लौकिकार्थाने बदललेला दलित



लेखक अंतर्यामी तोच भूतकाळातला असतो. भूतकाळातला तो आणि वर्तमानात काहीसा स्थिरावलेला तो यांच्या अंतर्व्दंदातून आत्मकथनाची निर्मिती झालेली असते.

**दलित आत्मकथनातील वास्तव**

आत्मकथनकार त्याच्या आत्मकथनातून गतकाळातील आठवणी सांगत असतो. हा गतकाळ त्याच्या आयुष्याचा एक भाग असतो. या आठवणींचे कथन हे त्याला आठवेल त्याप्रमाणे तो करीत असतो. अर्थात, काही त्याला अगदी जसे घडले तसे आठवेल, तर काही आठवणार नाही. आठवले तरी ते धूसर, अस्पष्ट असे असेल. उदा. 'आभरान'मध्ये पार्थ पोळके यांच्या लहानपणीचा, त्यांच्या झोपडीत साप निघाल्याचा प्रसंग सांगतात. तो बराचसा स्मरण आणि कल्पना यातून रेखाटलेला आहे हे लक्षात घ्यावे लागते. म्हणजे एखादी आठवण किती जुनी आहे त्यावर ते अवलंबून आहे. त्यावर तिचे धूसरपण किंवा अस्पष्टपण असणे अवलंबून आहे. काही आठवणी तर केवळ ऐकीव माहितीवर लिहिलेल्या असू शकतात. उदा. 'जिणं आमुचं'मध्ये बेबी कांबळे यांनी त्या वर्षा-दीड वर्षाच्या असतानाचा प्रसंग सांगितला आहे. दीड-दोन वर्षांची बेबी ही आजारपणाने मेली आहे असे समजून पुरण्याची तयारीही पूर्ण होते; पण आईच्या दुःखातील आग्रहामुळे तिला पुरले जात नाही आणि नंतर मुलगी जिवंत असल्याचे सर्वांच्या लक्षात येते व सर्वांना आनंद होऊन अर्थातच पुढचा अनर्थ वाचतो.. वयाच्या एक-दीड वर्षाच्या मुलीला हा प्रसंग कळणार तरी कसा आणि आठवणार तरी कसा ? अर्थातच ही आठवण त्यांच्या आईने किंवा इतर वडीलधाऱ्यांनी त्यांना सांगितलेली आठवण आहे, हे लक्षात घ्यावेच लागते. अशा आठवणींचे कथन करताना तीवर कल्पनेची पुटे चढविणे साहजिकच असते. शिवाय लेखक त्या आठवणीतील प्रसंगाकडे, अनुभवाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो, यावरही ते अवलंबून आहे.

प्रत्येक आठवणीतील प्रसंगाचे त्याला झालेले आकलनही महत्त्वाचे आहे. थोडक्यात आत्मकथनकार जेव्हा आणि जे सांगत असतो ते त्याच्या गतकाळातील संचित असते. हे संचित म्हणजे त्यांच्या भावभावनांचे, जाणिवांचे, आकलनाचे जणू सारच असते. कथा-कविता, कादंबरी, नाटक इत्यादी ललित साहित्यातून लेखक-कवी, नाटककार यापेक्षा वेगळे काय करीत असतात ? 'स्व'ला जाणवलेले, त्याला आकलन झालेले, त्याने अनुभवलेले, बघितलेले असे सर्व तो त्याने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखांवर किंवा पायावर आरोपित करून अभिव्यक्तीचे रूप प्राप्त करून देत असतो. त्याची ही अभिव्यक्ती, त्याचे अनुभव आणि कल्पनाशक्ती यांचे सुंदर मिश्रण असते. म्हणून त्याच्या कल्पितालाही वास्तवाचा एक समर्थ आधार असतो. दलित आत्मकथन हीसुद्धा एक ललित साहित्यकृतीच आहे. म्हणून यातील वास्तवाचे रूप तपासून बघत असताना हे लक्षात घेतलेच पाहिजे की, वास्तवाला एक कलाकृती म्हणून सादर करताना ती काही कल्पिताला घेऊन येणारच. अर्थात, अशा वेळी त्या कलाकृतीत कल्पिताचा अंश किती आणि वास्तवाचा किती, याचा विचार मनात येऊ शकतो. मात्र, त्याबरोबरच हेही ध्यानात घ्यावे लागते की, एखादी घटना किंवा प्रसंग चित्रित करीत असताना लेखकाने दिलेला तपशील कल्पित असू शकेल; पण मूळ अनुभवद्रव्य मात्र वास्तवच आहे. वास्तवाला कलात्मरूप देताना लेखक कल्पित आणि वास्तव यांचे रंग बेमालूमपणे एकमेकांत मिसळत असतो. त्यामुळे यातील कल्पित किती आणि वास्तव किती, हे शोधून काढणे तसे सोपे नसते. याशिवाय दलित आत्मकथनातील काही अनुभव हे त्यांच्या कुटुंबाचे, जातीचे, समाजाचे किंवा समाजघटकाचे असू शकतात. कारण त्याला केवळ त्याच्या वैयक्तिक पातळीवरचे दुःखभोग किंवा अनुभव सांगावयाचे नमतात, तर त्यांच्या एकूण समाजाच्या जाणिवा व्यक्त करावयाच्या अमतात. स्वतःच्या आयुष्याची दुःखद गाथा सांगून त्याला स्वतःविषयी वाचकांची सहानुभूती मिळवायची नसते तर ज्यांनी हे



भोगले, ज्यांच्या वाट्याला हे दुःख भोग आले, ज्यांचे शोषण झाले होते आहे त्यांना जागृत करावयाच असते. नव्या पिढीच्या जीवनात तर ते घडू नये म्हणून विद्रोहाची आग पेटवायची असते. त्याबरोबरच जे कुणी, ज्यांच समाज ज्यांचे पूर्वज दलितांच्या दुःखभोगाला कारणीभूत ठरले आहेत त्यांनीही अंतर्मुख व्हावे, असा या आत्मकथनाच हेतू आहे. दया पवार यांनी 'बलुतं' संबंधी लिहिले आहे. 'बलुतं' हे केवळ एका माणसाचे आयुष्य आहे. त्याच परिस्थितीला तोच एकटा जबाबदार आहे. आपण फक्त नीतिमूल्याचे मुखवटे लावून हंस - क्षीर न्यायाने निवाडा होऊ देऊ असे जर म्हणत असलो तर त्याच्या पायाखाली काय जळते आहे, याचे त्याला भान नाही असे म्हणावे लागेल.

**दलित आत्मकथनातील 'मी'**

दलित आत्मकथनामधून लेखकाची स्वतःची जडणघडण अभिव्यक्त होते. तो कसा घडत गेला हे वाचकाला ज्ञात होत असते. याचबरोबर त्याने काय व कसे भोगले, सहन केले, याचे अनुभव व त्यातून त्याने काढलेला मार्ग, केलेला संघर्ष कसा घडतो, याचेही दर्शन घडते. माणसाच्या बुद्धिकौशल्याचा सगळयात चांगला आविष्कार म्हणजे स्वतःपासून वेगळे होऊन स्वतःकडे बघण्याची, स्वतःशीच त्रयस्थाचे परकेपणाचे संबंध प्रस्थापित करून आत्मपरीक्षण करण्याची त्याची मानसिक शक्ती. दलित आत्मकथा लिहिणाऱ्या लेखकांनी याच भूमिकेतून बघितलेले दिसते. इतर कथात्मक आणि ललित साहित्यातून येणाऱ्या वेगवेगळ्या स्वभाववैशिष्ट्यांनी आणि गुण-दोषांनी परिपूर्ण असणाऱ्या व्यक्तिरेखापैकी आपणही आहोत, ही भूमिका लक्षणीय आहे. कारण त्याचमुळे समाजातील सामाजिक, धार्मिक अंधश्रद्धा असणारी दास्यत्वाची परिस्थिती यांच्याशी त्यांचा चाललेला लढा हा त्यांच्याही नकळत आत्मकथनामधून आविष्कृत होतो. कित्येकदा काहीच चूक नसताना

होणाऱ्या अवहेलनेमुळे त्यांच्या मनात उठणारे वादळ या निमित्ताने तपासून पाहता येते.

डॉ. भालचंद्र फडके यांनी दलित आत्मकथनांना 'दुःखाच्या अभंगगाथा' असे म्हटले आहे. कारण या लेखकांनी या गाथा, ही आत्मकथने रंजनासाठी कल्पनाविलासासाठी लिहिलेली नसून आपण भोगलेल्या भोगांची, प्रस्थापित समाजव्यवस्थेने त्यांच्यावर लादलेल्या दुःखद जिण्यांची कहाणीही त्यांना वाचकांना सांगावयाची आहे. आपल्यावर या प्रस्थापित दुष्ट समाजव्यवस्थेने धर्म, परंपरा आणि रूढींच्या नावाखाली दिलेल्या डागण्यांचे, त्यांच्या कुटील नीतीमुळे प्राप्त झालेल्या दैन्य - दास्यांचेही चित्रण घडवावयाचे असते. म्हणून दलित आत्मकथनातील 'मी' हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आणि व्यक्तिगत जाणिवांनी युक्त अशा दोन्ही स्वरूपांत प्रकट झालेला असतो.

दलित आत्मकथनातील जाणिवा या दलित समाजाच्या प्रातिनिधिक जाणिवा आहेत, हे मान्य केले तर ज्यातून केवळ व्यक्तिगत पातळीवरच्या भाव-भावना, विकार - वृत्ती यांचे प्रकटीकरण 'दलित' संकल्पनेच्या मर्यादा ओलांडून केलेले प्रकटीकरण ठरते अशा 'स्व'ला किंवा 'मी'ला दलित साहित्यातील 'आम्हीपेक्षा वेगळे' परिमाण लाभते.

**आत्मशोध**

परिवर्तनाच्या चळवळीमुळे दलितांना जे आत्मभान प्राप्त झाले, त्याचा परिणाम म्हणून दलित लेखक आपल्या सभोवतीचं वास्तव न्याहाळू लागला. त्या वास्तवाशी आपले नातेसंबंध शोधू लागला. इतिहासात आपले स्थान पाहू लागला. जी संस्कृती आपली आहे असे हजारो वर्षे तो मानत आला त्या संस्कृतीशी असणारा आपला नातेसंबंध न्याहाळू लागला, हा शोध म्हणजे 'आत्मशोध.' या आत्मशोधाची विविध पातळयांवरील रूपं आपणाला दलित साहित्यात दिसून येतात. दलित साहित्याच्या निर्मितीचे आदिकारण 'आत्मभान' आहे, तर दलित साहित्याच्या आविष्काराला



निरनिराळी रूपे देणारा 'आत्मशोध' हा दलित साहित्यातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. याच आत्मशोधातून नकार आणि विद्रोहाची भाषा जन्माला येते. याच आत्मशोधातून स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्व या मूल्यांचा आग्रह लेखनकृतीत आढळून येतो. या आत्मशोधाची काही रूपे उदाहरणादाखल सांगता येतील. सगळ्या गावातील दिवे लावणाऱ्या वडिलांच्या झोपडीत मात्र अंधार असायचा, हे पाहिल्यावर शरणकुमार लिंबाळे म्हणतात

"बा तू त्यांच्या वाटेवर दिवे लावलेस
पण त्यांनी तुझी वाट अंधारीच ठेवली रे !"

तर 'मीठ है तर पीठ नहीं पीठ है तर मीठ नहीं' असं दरिद्री जीवन जगता जगता ज्योती लांजेवार यांची माय

"देऊ केलेलं उष्ट अन्न स्वाभिमानानं नाकारताना
तू शिकून आंबेडकरावानी होजो बाप ! "

असा आशावाद प्रकट करते. कुटुंबातील अठराविश्व दारिद्र्य आणि या दारिद्र्यातही स्वतःच्या सामर्थ्यावर आंबेडकरांसारखे मोठे व्हावे असे संस्कार करणारी माय-बाप व बंधू-भगिनी आपणाला दलित साहित्यात सर्वत्र पाहावयास मिळतात; पण दलितांच्या सभोवतीचं वास्तव मात्र अत्यंत भीषण आहे. परंपरागत गुलामीच्या टाचेखाली दलितांनी दबून राहावे, अशी मानसिकता असणारा गावकुसाच्या आतला समाज दलितांच्या असहायतेचा, त्यांच्या दारिद्र्याचा फायदा घेतो. दलित वस्तीतल्या लेकीबाळींची अब्रू लुटतो. शरणकुमार लिंबाळे हीच वेदना खालील ओळीत प्रकट करतात -

"तिला तारुण्य दिलं! गल्लीतल्या पोरांनी अजाणपणी
तिला पाळी येण्याअगोदर
पाळीत उभं केलं जनावरावाणी

नीलकांत चव्हाण यांनी दोन स्त्रियांचा नातेसंबंध 'वळ' या कवितेत दाखविला आहे. खरे तर भारतीय संस्कृतीत स्त्रीचा दर्जा शूद्राएवढाच. तरीपण सवर्ण स्त्री कवीच्या आईला बोलावून गंजलेल्या, कोनाड्यातल्या टमरेलानं चहा देणार आणि अंगणात उभे करून -

"ताकाच्या भांड्यात, दुरून ताक ओतायची
भांडे जवळ नेले की शिवी हासडायची."

अशा वस्तीतला संवेदनक्षम मुलगा शाळेत गेला तर त्याला कुठे बसावे लागते, कसे शिकावे लागते, याचे अतिशय भीषण चित्रण शंकरराव खरात यांच्या 'तराळ - अंतराळ' या आत्मकथेत आले आहे. प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथेत त्यातल्या त्यात गोठ्यात आसरा देणारी गुरुमाय भेटते. वैजनाथ कळसे यांच्या 'आयरणीच्या घणा' या आत्मकथेत शिक्षण घेताना जी उपासमार सोसावी लागली त्याचे विदारक दर्शन घडते. हीच व्यथा माधव कोंडविलकरांनी खालील ओळीत प्रकट केली आहे.

तेव्हा झाला एकच कल्लोळ. साऱ्या वळवळल्या, म्हणाल्या, 'आमची शाळा बाटकलं' आणि शाळेनं कोपरा उदारतेने बहाल केला तेव्हा शिळा तुकडा घशाला अडकावा तसा एक काटा खोल कुठेतरी रुतून बसला. सवर्ण पोस्टमनसुद्धा दलित वस्तीत पत्र नेऊन देण्याची टाळाटाळ करतो. त्यामुळे वाचनाची उपासमार होणारे माधव कोंडविलकर एका लहानशा आडगावात तळमळत राहतात, याचे प्रत्ययकारी दर्शन 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मकथेत येतं. स्वातंत्र्यानंतर नवशिक्षणामुळे आत्मभान लाभलेले हे कविमन आत्मशोध घेऊ लागते. म्हणजे गाव आणि आपण यातलं बोचरं अंतर त्याला तीव्रतेनं जाणवू लागते. ही जीवघेणी वेदना मग शब्दांत उतरू लागते

"आमचं गाव
हे आमचंच गाव



या गावातल्या गल्ल्या
आमच्या बापाच्या नाहीत
या गावाची वेस
ही आमची सावत्र आई!
'त्यांच्या' वराती
या वेशीतून थाटानं जातात"
आमची प्रेतंही तिथून नेता येत नाही !'

आपण आणि आपल्या सभोवतीचा गाव यांतील हा विसंवाद न्याहाळता- न्याहाळता देशातील घटना पाहिल्या की, हा अन्याय देशभर सार्वत्रिक आहे, हे ध्यानात येऊ लागते. एरणगाव, बेलछी, अकोले, मीनाक्षीपुरम् अशा कितीतरी गावांची नावं सांगता येतील, जिथं स्वातंत्र्यानंतरच्या काळात दलितांवर सामूहिक हल्ले झाले आहेत. या सामूहिक हल्ल्यांचे अतिशय जळजळीत चित्रण दलित साहित्यात व्यक्त होते. अशा कठोर वास्तवात सैरभैर झालेल्या कथानायकाचं चित्रण करताना श्री. म. माटे यांनी 'बन्सीधर, तू कुठे रे जाशील ?' असा आर्त प्रश्न विचारणारी कथा लिहिली. एका गावात नंदीवाले स्थिर झाले. ओघाने मजुरांची संख्या वाढली. परिणामी, मजुरीचा दर कमी झाला, म्हणून त्यांना हुसकावून लावण्यासाठी त्यांची वस्तीच जाळून टाकण्यात आली, तेव्हा त्यांच्यासमोरच प्रश्न 'आता पुढं कुठं ?' असा आहे. शंकरराव खरात यांनी नंदीवाल्यांचे हे भीषण दुःख कथेत प्रत्ययकारी केलं आहे. बाबुराव बागूलांच्या 'विद्रोही' या कथेचा नायक जयचंद राठोड हा जन्माने भंगी आहे. मॅट्रिक पास झाल्यानंतरही भंग्याची पाटी त्याला उचलावी लागते, असा परिस्थितीचा रेटा निर्माण होतो. हा सर्व कोंडमारा ज्या जन्मजातीमुळे निर्माण होतो, तिच्यापासून सुटका करून घेण्यासाठी बाबुराव बागूलांचा एक कथानायक जात चोरून राहतो आणि ती उघडकीला आल्यानंतर भरपूर मार खातो.

म्हणूनच कोंडमारा असह्य झालेले नामदेव ढसाळ खडा सवाल करतात

"स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे ?
रामराज्याचा कितव्या घरात आपण हातोत ?"

या आत्मशोधाची आणखी एक पातळी दलित साहित्याला लाभली आहे. इतिहास, पुराणं, धर्मशास्त्र यांत दलितांच स्थान काय ? दलितांच्या जगण्यात गेल्या हजारो वर्षांत कुठला बदल झालेला नाही? संतांनी मोक्षाचा मार्ग खुला केला. पण ऐहिक जीवनातील विषमता आहे तशीच राहिली. जो देव हजारो वर्षे स्वतःचा देव म्हणून मानला त्याच्या दर्शनाला मनाई. एवढेच नाही तर त्या भाषेतले शब्द चुकून कानावर पडले तरी दलितालाच शिक्षा ! ज्यांना धर्मबांधव मानले ते दलितांच्या मावलीचाही विटाळ मानणार, दलित साहित्याची चर्चा सुरू झालेली नव्हती अशाही काळात हीच संवेदनशीलता चोखोबांच्या अभंगातून प्रकट होते ती अशी

"वेदाशी विटाळ शास्त्रास विटाळ।
पुराणे अमंगळ।
विटाळाची ॥ जन्मता विटाळ |
मरता विटाळ।
चोखा म्हणजे विटाळ | आदिअंती ॥ "

सारांश राहते गाव, सभोवतीचे वास्तव, इतिहास आणि धर्म यांना आपले मानत आपण जगत होतो हाच मुळी एक फार मोठा भ्रम होता, असा निष्कर्ष या आत्मशोधातून हाती येतो. त्यामुळे याला नकार देणे हाच चळवळीचा पहिला टप्पा ठरतो. बंधुमाधवांच्या शब्दांत सांगायचे तर 'आम्हीबी माणमं हौत' या ठाम निर्धाराने उभा राहिलेला साहित्यिक कोंडमारा असह्य होतो आहे, याची तीव्र जाणीव प्रकट करतो. या आविष्काराचेच एक रूप मग तीव्र स्वरूपाच्या 'नकारात' प्रकट होऊ



लागते. महात्मा ज्योतीराव फुले यांनी 'गुलामगिरी' ग्रंथात 'दशावतार' कथेचे केलेले विश्लेषण किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शूद्र पूर्वी कोण होते ?' यां ग्रंथात शूद्रांचा घेतलेला ऐतिहासिक मागोवा ही या आत्मशोधाचीच उदाहरणे होत. जे वैचारिक वाङ्मयात प्रथम प्रकट झाले तेच नंतरच्या काळात मग ललित वाङ्मयात अवतरले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) दलित साहित्याचे प्रकाशयात्रा - १० (अ) मालचंद्र फडके
२) दलित साहित्य : सिध्दांत आणि स्वरूप ११(अ) मनोहर जाधव
३) साहित्य : दलित आणि ललित – १३ (अ) गो. म. कुलकर्णी
४) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह (१४) (ड) मालचंद्र फडके
५) दलित आत्मचरित्र साहित्य आणि समाज (१५) क) रमेश घोंगडे

मराठी विभाग प्रमुख
बडनेरा